झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/उजि/सुविधा बांधकाम/२०११/ 1914

परिपत्रक क्रमांक :-१२७

17 JUN 2011

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये बांधण्यात आलेल्य बालवाडी समाज हॉल, इत्यादीच्या गैरवापराबाबत कारवाई करणे.

विकास नियंत्रण नियमावली ३३।१०। परिच्छेद ८.१ मधील तरतुदीप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये प्रत्येक्ष १०० झोपडपट्टीवासियांच्या कुटुंबाला एक किंवा त्याच्या भागाला २०.९० चौ.मिटरचे एक समाज मंदिर व त्याच प्रमाणात बालवाडी व सहकारी संस्थेकरीता कार्यालय उपलब्ध करुन देण्याची तरतुद असल्याने सदरच्या सुविधा झोपडपट्टी पुनर्वसन योजनांअंतर्गत उपलब्ध करुन दिल्या जातात.

विकास नियंत्रक नियमावलीतील तरतुदीनुसार सदरच्या सुविधा या त्याच वापरासाठी उपयोगात असणे अभिप्रेत आहे. त्याचा गैरवापर झाल्यास त्या प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्याची तरतुद असल्याने तसेच यापुढेही त्याचा गैरवापर होऊ नये म्हणून सदरच्या सुविधांबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१. अ) यापूर्वी पूर्ण झालेल्या योजनामध्ये बालवाडी, समाज मंदिर व संस्थेचे कार्यालय मंजुर आराखडयानुसार किती आहेत त्याची सविस्तर माहिती उपमुख्य अभियंता, झोपुप्रा यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी/ कर्मचा-यांमार्फत संकलीत करुन सचिव, झोपुप्रा यांना सादर करणे.

ब) माहिती संकलित झाल्यानंतर प्रत्यक्ष वापराच्या अनुषंगाने खात्री करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाच्या दुय्यम अभियंता, सहकार अधिकारी व उपसमाज विकास अधिकारी यांनी त्यांचे पथक निर्माण करुन पथकाने वापराबाबतचा अहवाल सचिव, झोपुप्रा यांना सादर करावा.

क) सदर अहवालानुसार गैरवापर होत असल्यास उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी |सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास| अधिनियम १९७१ मधील कलम ३३ अन्वये निष्कासनाबाबतच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधित सक्षम प्राधिकारी यांना प्रस्ताव

पाठविणे. निष्कासनाच्या अनुषंगाने दुय्यक अभियंता यांनी सक्षम प्राधिकारी यांच्या संपर्कात राहुन रिकामी सदनिका प्राधिकरणाच्या ताब्यात घेणे.

२. या पुढे पुर्ण होणा-या योजनांमध्ये विषयांकीत सुविधांचा गैर वापर होऊ नये या दृष्टीने उपमुख्य अभियंता, झोपुप्रा यांनी मंजुर आराखडयानुसार योजनेत असलेल्या अनिवासी सदनिका व सुविधांबाबतची माहिती सहकार विभागास संस्थेच्या सोडतीच्या पूर्वी पुरविणे व सहकार विभागाने निवासी सदनिकांची सोडत काढत असताना अनिवासी सदनिका संबधित धारकास संस्थेमार्फत वाटप करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे तसेच नमुद सुविधा संस्थेने ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही केली याची खातरजमा करावी त्याचप्रमाणे सदर सुविधांच्या ताब्या विकासकाने संस्थेस दिला काय याची खात्री केल्यानंतरच अभियांत्रिकी विभागाने भोगवटा प्रमाणपत्र देणे. तदनंतर सदर सुविधा जतण करण्याची जबाबदारी संबधित सहकारी गृहनिर्माण संस्थेची राहील व गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सहकार विभाग झोपुप्रा यांचे मार्फत संबंधित संस्थेवर सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण